# प्रेस नोट दि. ०३/०७/२०२१

## गुन्हे शाखा, युनिट-४, पिंपरी-चिंचवडची कारवाई

**काळविटाची शिंगे विकण्यासाठी आलेल्या ०२ आरोपींना अटक**

**त्यांचे कडुन ५,००,०००/- रु. किं ची ०५ जोडी काळविटाची शिंगे जप्त**

**तसेच तीन आरोपींना अटक करुन त्यांचे कडुन वाहन चोरी व घरफोडीचे ०२ गुन्हे उघड, एकुण ५९,५००/- रु. किं चे ०२ मोबाईल फोन, रोख रक्कम व ०१ मोटारसायकल जप्त**

दि. ०२/०७/२०२१ रोजी गुन्हे शाखा युनिट-४, चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, प्रसाद गोकुळे यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहायक पोलीस उपनिरीक्षक, नारायण जाधव, पोहवा/ ४७० असवले, पोना/ ११४२ आढारी, पोशि/१८७२ चव्हाण, पोशि/२१०२ सैद असे वाकड पोलीस ठाणे हद्दित वाढती वाहन चोरी व घरफोडी चोरी गुन्हयाचे अनुषंगाने पेट्रोलिंग करीत असताना गुन्हे शाखा युनिट-४ कडील **पोना/११४२ लक्ष्मण आढारी** यांना त्यांचे बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहिती नुसार चाकण शिक्रापुर रोड वरिल वडगाव घेनंद फाटा येथे काळविटाची शिंगे विक्री करिता आलेले आरोपी नामे **सचिन गजानन राठोड, वय-२२ वर्षे रा-मु.पो. गणेशपुर ता. दारव्हा जि. यवतमाळ व सागर रामराव मात्रे, वय-२३ वर्षे रा- डॉ. प-हाड यांचे घरी, स्टेट बँक जवळ, पाबळ चौक,शिक्रापुर पुणे मुळ रा. साजेगाव ता. दारव्हा जि. यवतमाळ** यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडुन भारतिय वन्यजीव प्राणी संरक्षण कायदा १९७२ चे परिशिष्ट ०१ मध्ये सामिल असलेल्या **काळविट या प्राण्याचे ५,००,०००/- रु. किं ची ०५ जोडी काळविटाची शिंगे** जप्त करण्यात आली असुन त्यांचे विरुद्ध चाकण पोलीस ठाणे, गु.र.नंबर- ७८१/२०२१ वन्यजीव प्राणी संरक्षण कायदा १९७२ चे कलम ०९,३९,४३,४८(अ),४९,५१ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच त्यांचे कडे मिळुन आलेल्या काळविटाचे शिंगांबाबत केलेल्या तपासात त्यांनी त्यांचे मुळ गावाकडे शेताला लावलेल्या इलेक्ट्रीक तारेचे कंपाउंड ला करंट लागुन मरण पावलेल्या काळविटांची सदर शिंगे असल्याचे सांगितली आहे. तसेच पुढील तपास चाकण पोलीस ठाणे हे करत आहे.

तसेच दि. ०२/०७/२०२१ रोजी गुन्हे शाखा युनिट-४, चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, प्रसाद गोकुळे यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पो.उपनिरीक्षक, आवटे, पोहवा/५१७ दळे, पोहवा/९१६ शेटे, पोना/ मुंढे, पोना/१५१६ जायभाये असे वाकड पोलीस ठाणे हद्दित वाढती वाहन चोरी व घरफोडी चोरी गुन्हयाचे अनुषगाने पेट्रोलिंग करीत असताना गुन्हे शाखा युनिट-४ कडील **पोना/१५१६ सुरेश जायभाये** यांना त्यांचे बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहिती नुसार डांगे चौक वाकड येथुन चोरीचे वाहन घेवुन थांबलेला आरोपी नामे **राजेश ऊर्फ रवी बंडु थोरात ,वय-१९ वर्षे, रा- म्हातोबा नगर झोपडपट्टी, वाकड, पुणे** यास ताब्यात घेवुन त्याचे कडुन **एक हिरो होंडा कंपनीची मोटारसायकल** जप्त करण्यात आली आहे. तसेच बिर्ला हॉस्पिटल समोरुन ताब्यात घेण्यात आलेले आरोपी नामे **सुनिल ऊर्फ दाद्या मोहन शिंदे वय- ३० वर्षे रा. म्हातोबा नगर झोपडपट्टी, वाकड पुणे व राजेंद्र ऊर्फ फकाट लक्ष्मण पारधे वय- २२ वर्षे रा. म्हातोबा नगर झोपडपट्टी, वाकड पुणे** यांचे कडुन घरफोडीचे गुन्हयातील **०२ मोबाईल फोन व रोख रक्कम असा ०२ गुन्हयातील एकुण ५९,५००/- रु. किं. चा मुद्देमाल** जप्त करण्यात आला असुन सदर बाबत खालील प्रमाणे गुन्हे उघडकिस आले आहेत.

**१. वाकड पोलीस ठाणे, गु.र.नंबर-५३२/२०२१ भा.दं.वि.कलम- ३७९**
**२. वाकड पोलीस ठाणे, गु.र.नंबर-५३७/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०**

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे सो, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे मा. सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. प्रशांत अमृतकर सो यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक सिद्धेश बाबर, सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, नारायण जाधव, पोहवा/ प्रविण दळे, संजय गवारे, अदिनाथ मिसाळ, राहिदास आडे, तुषार शेटे, संतोष असवले, पोना/ लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे, पोशि/ प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश जायभाये, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, यांनी केली आहे.**

Hiremath

**(सुधीर हिरेमठ) भा.पो.से**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे
गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner